Telephone : 02472-223944
E-mail :
dahoosmanabad@gmail.com
dahoosmanabad-mh@gov.in

जिल्हा परिषद उस्मानाबाद
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद.४१३५०१
Animal Husbandry Department Z.P.Osmanabad 413501

जा.क्र.जिपउ/पशुसंवि/तां-२/ ४४३/२० पशुसंवर्धन विभाग, जि.प. उस्मानाबाद दिनांक२५/०९/२०२०

*तात्काळ/कालमर्यादा*

**प्रति,**

------------- ---------------
------------- ---------------
------------- ---------------

**नोटीसबोर्ड**

**विषय :– पशुसंवर्धन विभाग जि.प. उस्मानाबाद या कार्यालया मार्फत लंपी स्किन लस मात्रा खरेदी करण्याचे दर पत्रके मागविणेसाठी अटी व शर्ती प्रसिध्द करणे बाबत..**

वरीलविषयी कळविण्यातयेतेकी, पशुसंवर्धनविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादकार्यालया मार्फत उस्मानाबाद जिल्हयातील ९५ संस्था / (८-तालुके) जिल्हा परिषद सेस सन २०२०-२१ अंतर्गत रुपये २.९९ लक्ष तरतुद मर्यादेत लंपी स्किन लस खरेदी करावयाची असल्याने पुरवठाधारकाकडुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.दरपत्रके सर्व करासहीत (कार्यालय पोहोच) **लंपी स्किन लस खरेदीचे दर पत्रके** अस लिफाफ्यावर नमुद करुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे नांवे संबांधित करुन पशुसंवर्धन विभागात नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 7 दिवसाचे आत सादर करावेत.

**लंपी स्किन लस खरेदी दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

१) सदरील योजने अंतर्गत लंपी स्किन लस खरेदी रुपये २.९९ लक्ष मर्यादेत राहील.
२) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
३) निविदाकाराने GST नोंदणी क्रमांक व पॅनकार्ड सादर करणे बंधनकारक राहील.
४) खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकाराने हमी देणे बंधनकारक राहील.
५) लंपी स्किन लस खरेदी दरपत्रकाच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे बंधपत्रक पुरवठाधारकांने स्वाक्षरी करुन सादर करावे, त्यावर संस्थेचा पत्ता पिनकोड नंबरसह, फोननंबर, मोबाईल नंबर नमुद करण्यात यावा.
६) लंपी स्किन लसीचा दर प्रती मात्रा रुपयात नमुद करुन स्वाक्षरीसह सिलबंद पाकिटात सादर करावे.